महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन ज्ञापन क्र. दुरुस्ती-०११९/प्र.क्र.८०/पोल-७.
मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२.
दिनांक २९ मे २०१९.

विषय :- पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या आस्थापनेवरील कन्नमवार नगर, विक्रोळी (पूर्व), मुंबई, येथील निवासी इमारत क्र.२१३ व ७७ यांमध्ये अंतर्गत व बाह्य दुरूस्तीची विवक्षित कामे करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ :-
१) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/ १३/ विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.
३) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. पोआ/ कक्ष-८(१३)/ शा.९०/२०१९, दिनांक १६.०३.२०१९.

ज्ञापन.

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, यांनी कन्नमवार नगर, विक्रोळी (पूर्व), मुंबई, येथील निवासी इमारत क्र.२१३ व ७७ यांमध्ये अंतर्गत व बाह्य दुरूस्तीची विवक्षित कामे करण्यासाठी एकूण रु.१,२७,६४,६२३/- इतक्या खर्चाच्या अंदाजास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

२. उक्त खर्चाचे अंदाज हे सहायक अभियंता, श्रेणी-१, कुर्ला (सा.बां.) उप विभाग, यांनी सन २०१८-१९ च्या दरसूचीनुसार तयार केले असून ते कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई, यांनी साक्षांकित केले आहेत.

३. उक्त खर्चाचे अंदाज हे सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी तपासले आहेत व त्याप्रमाणे प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास, विवक्षित अटींवर, सहमती दिली आहे.

४. त्या अनुसार, कन्नमवार नगर, विक्रोळी (पूर्व), मुंबई, येथील निवासी इमारत क्र.२१३ व ७७ यांमध्ये अंतर्गत व बाह्य दुरूस्तीची विवक्षित कामे करण्यासाठी एकूण रु.१,२७,६४,६२३/- *(रुपये एक कोटी, सत्तावीस लक्ष, चौसष्ट हजार, सहाशे तेवीस फक्त)* इतक्या खर्चाच्या अंदाजास, पुढील अटींवर, याद्वारे, प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

१) निधी उपलब्ध झाल्याशिवाय काम सुरू नये;
२) खर्चाचे अंदाज हे पोलीस सह आयुक्त (प्रशासन), बृहन्मुंबई, यांनी साक्षांकित करणे आवश्यक आहे.

५. उक्त कामासाठी येणारा खर्च हा गृह विभाग-मागणी क्रमांक बी-१, २०५५, पोलीस, ००, १०८, राज्य मुख्यालय पोलीस, (०२) शहर पोलीस, (०२)(०१) शहर पोलीस-आस्थापना (दत्तमत)(अनिवार्य) (२०५५ ००९७), २७-लहान बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हे ज्ञापन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१६५/२०१९/इमा.-२, दिनांक ०३.०४.२०१९, अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. हे ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०५२९१५५५१६२१२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad01184493f2735ad885627, postalCode=400032, street=2ND FLOOR,MANTRALAYA,MADAME CAMA MARG,MUMBAI, serialNumber=8538cd1e408948f7d025537d5f6589bd8958d1b95322e66d2cc5edf89ad0d79e, ou=HOME DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SWAPNIL GOPAL BORSE
Date: 2019.05.29 15:58:45 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,
पोलीस आयुक्त,
बृहन्मुंबई.

प्रत-

१) कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई.
२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
४) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
५) कार्यासन अधिकारी (इमा.-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) कार्यासन अधिकारी (व्यय-७/ विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) निवड फाईल (पोल-७).